# वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी खासदार निधी प्रस्तावित

## खा. डॉ. संजीव नाईक यांची माहिती

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

खासदार निधी हा मतदार संघातील वैशिष्ट्यपूर्ण आणि साधारणपणे २० ते २५ वर्षे नागरिकांना सुविधा देणाऱ्या प्रकल्पांमध्ये वापरण्याचे प्रस्तावित केल्याची माहिती आज ठाणे लोकसभा मतदार संघाचे खा. डॉ. संजीव नाईक यांनी दिली.

खा. डॉ. नाईक यांनी आज येथे पत्रकार परिषद घेऊन ज्या प्रकल्पांसाठी त्यांचा निधी वापरण्यात येणार आहे, त्याविषयी माहिती दिली. काही वृत्तपत्रामध्ये खा. डॉ. नाईक यांनी खासदार निधीचा वापर केला नसल्याचे वृत्त छापून आले होते. ते वस्तूस्थितीला धरून नसल्याचे ते म्हणाले.

ठाणे महापालिका आणि नवी मुंबई महापालिका, मीरा-भाईंदर महापालिका यांचे वार्षिक अर्थसंकल्प प्रत्येकी १ हजार कोटींच्यावर आहे. ठाणे लोकसभा मतदार संघात या तीन मोठ्या महापालिका येतात. एवढ्या मोठ्या अर्थसंकल्प असलेल्या महापालिकांच्या हद्दीमध्ये रस्ते, पदपथ, गटारे वीज विषयक छोटी कामे, बसथांबे यासाठी खासदार निधी वापरण्यापेक्षा तो वर्षानुवर्षे टिकेल अशा सुविधांच्या कामांसाठी वापरण्याची आपली आणि पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नवी मुंबईतील नेरूळ येथे नवी मुंबई महापालिकेच्यावतीने भव्य अशा चिल्ड्रन पार्कची निर्मिती केली जाणार आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गणेश नाईक यांच्या सूचनेनुसार या पार्कसाठी खासदार निधीतून सुमारे १ कोटी रूपये खर्च केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. ॲम्पी थिएटर,

उद्यान निवास इत्यादी या पार्कची वैशिष्ट्ये असून या पार्कमुळे नवी मुंबईतील मुलांसाठी विरंगुळ्याचे मोठे दालन निर्माण होणार आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेतील मैदानाचे आरक्षण क्र. ११९ चाही खासदार निधी मधून विकास करण्यात येणार आहे. या ठिकाणी इंडोअर स्टेडियम, मैदान,जॉगिंग ट्रॅक इत्यादी लोकोपयोगी सुविधा प्रथमच या शहरात उभ्या करणार आहे. या इंडोअर स्टेडियममुळे मीरा-भाईंदरच्या वैभवात भर पडणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील १८ किलोमीटर लांबीच्या खाडी किनाऱ्याचे संवर्धन करण्याचे प्रस्तावित आहे. या अंतर्गत निसर्गाशी साधर्म्य राखून खाडी किनारा विकसित करणे, खारफुटी लावणे, शॅलो वॉटर पार्क आणि पर्यटन स्थळे विकसित करण्यात येणार आहेत. या कामासाठी तज्ञ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी १५ लाख रूपयांचा निधी द्यावा, अशी विनंती खा.डॉ. नाईक यांना तत्कालीन पालिका आयुक्त नंदकुमार जंत्रे यांनी केली होती. मात्र खासदार निधीच्या विनियोगासंबंधी मार्गदर्शक तत्त्वानुसार तांत्रिक सल्लागारासाठी खासदार निधी वापरता येणार नाही, असा अभिप्राय जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याने या कामांसाठी निधी देण्यात आला नाही. मात्र शॅलो वॉटर पार्कसाठी पालिकेसाठी २ कोटी रूपयांचा निधी प्रस्तावित केल्याचे खा. डॉ.नाईक म्हणाले. नवी मुंबई महापालिकेचा प्रकल्प सन २०१२ पर्यंत तर मीराभाईंदर महापालिकेचा प्रकल्प २०१३, ठाणे महापालिकेच्या प्रकल्पांच्या कामास सन २०१४ पर्यंत सुरूवात होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

खासदार निधी हा परत जात नाही असे स्पष्ट करून जनतेच्या हितासाठी सुनियोजित पद्धतीने हा निधी वापरण्याची भूमिका असल्याचे ते म्हणाले. भाजपाचे खा. रूडी यांनी त्याचा संपूर्ण खासदार निधी हा हॉस्पिटलच्या निधीमध्ये वापरल्याचे उदाहरण त्यांनी यावेळी दिले. ठाणे मतदार संघात ६ विधानसभेचे मतदार संघ येत असून त्यामध्ये जवळजवळ समप्रमाणात खासदार निधी वापरून उर्वरित निधी आवश्यकतेप्रमाणे वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.खासदार निधीचा सदुपयोग कशा प्रकारे करावा या विषयी सूचना पाठविण्याचे आवाहन खा. डॉ. नाईक यांनी नागरिकांना केले आहे.